प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय /शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालय शिक्षक व प्रशासकीय सेवा (गट-ब) या पदावर रूजू न झालेल्या उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः नियुक्ती-२०१७/ प्र.क्र.(२३१/१७)/तांशि -१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक -: ०५ मार्च, २०१८

संदर्भ :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एससीटी-६५१३/प्र.क्र.(१५/१३)/ तांशि-१, दि.२१/११/२०१६
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.४/आस्था/प्रबंधक/रूजू अहवाल/२०१७/३८५, दि.०२/०८/२०१७

प्रस्तावना-:

प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक व प्रशासकीय सेवा (गट-ब) या पदाकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या १२ उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.५ (८) अन्वये, सदर उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रुजू व्हावे, अशा सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि, सदर उमेदवारांपैकी काही उमेदवार विहीत कालावधी/ रुजू होण्याकरीता दिलेल्या मुदतवाढीचा कालावधी उलटून गेल्यानंतरही उक्त पदावर त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्याने संबंधित उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -:

महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत खालील उमेदवारांची प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/ शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक व प्रशासकीय सेवा (गट-ब) या पदावर संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आलेली नियुक्ती या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे. यापुढे संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२१/११/२०१६ च्या नियुक्ती आदेशातील नियुक्तीबाबत खालील उमेदवारांच्या कोणत्याही मागणीचा विचार केला जाणार नाही.

अ. क्र	उमेदवाराचे नाव	गु.क्र.	वर्गवारी	आयोगाची शिफारस	पदस्थापनेचा तपशील
१)	श्री. मरकड राजेंद्र विठ्ठल	०४	इ.मा.व	खुला	शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर.
२)	श्री. बुदगे राजेश श्रीराम	०६	खुला	खुला	शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर
३)	श्री. हटवार सुनिल प्रल्हाद	०७	इ.मा.व	खुला	शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ
४)	श्री.गुंडू राजेश राजाराम	१९	वि.मा.प्र	वि.मा.प्र	शासकीय तंत्रनिकेतन, बीड

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०५१७२२३९३७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sameer Laxman Dhere

Digitally signed by Sameer Laxman Dhere
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6ab4a357b0e2247b4328b57f45f509bf1bf0bd20c865128a018421c354bddc5, serialNumber=6ee64cf9b42881125c3715a5db341b5827c5743c728bc85f04bb71ff8fc154d6, cn=Sameer Laxman Dhere
Date: 2018.03.05 17:25:04 +05'30'

(समीर ढेरे)
कार्यासन आधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

- **सर्व संबंधित उमेदवार**

प्रत,

१. मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
२. संचालक,तंत्रशिक्षण,तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राद्वारे)
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर.
५. प्र.सहसंचालक,तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर/औरंगाबाद/अमरावती. (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
६. संबंधित प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/शासकिय तंत्रनिकेतन (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
७. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
८. अप्पर मुख्य सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई.
९. निवड नस्ती (तांशि-१).